॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा राज्यपातळीवरील प्रतिष्ठेचा असा सन २०२५ चा साहित्य क्षेत्रासाठी असलेला कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्कार धुळे येथील प्राचार्य डॉ. संजीव भगवानसिंग गिरासे यांना जाहीर झाल्याची घोषणा कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांनी केली आहे.

विद्यापीठाकडून या पुरस्कारासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या व्यक्तीमत्वाची ओळख असलेल्या ग्रामीण साहित्य आणि काव्य हा मध्यवर्ती केंद्रबिंदू असणाऱ्या साहित्यात किमान १५ वर्षे योगदान दिलेल्या व्यक्ती / संस्थेचे प्रस्ताव मागविण्यात आले होते. साहित्यक्षेत्राचा हा पुरस्कार व्यक्ती / संस्था यांच्यासाठी जाहीर करण्यात आला होता. विद्यापीठास व्यक्तींचे १२ व संस्थांचे ३ प्रस्ताव असे एकूण १५ प्रस्ताव पुरस्कारासाठी प्राप्त झाले होते. कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांनी या पुरस्कार निवडीसाठी समिती गठीत केली होती. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. पंडीत विद्यासागर यांच्या अध्यक्षतेखालील या समितीमध्ये अखिल भारतीय साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष साहित्यिक डॉ. नरेंद्र पाठक व महसुल अधिकारी तथा साहित्यिक आबा महाजन यांचा समावेश होता. समितीने डॉ. गिरासे यांच्या नावाची एकमताने शिफारस केली.

डॉ. गिरासे यांनी ग्रामीण साहित्यात विशेष लेखन केले असून 'अहिराणी भाषेत कांदबरी लेखन केले आहे. लगीन, पायखुटी, पऱ्हेड, वडांग, डोचर या कांदबऱ्यांचे लेखन केले असून क्षितीज, पळत बी चावत बी, डफड, मिरला, भित्तुक, हारीक, चोखणी हे कथासंग्रह तर आगारी, आयपन, छापाकाटा अशा ललित गद्यांचे लेखन केले आहे. त्यांची काही कांदबरी, कथासंग्रह, लघुकथा विविध शैक्षणिक अभ्यासक्रमात समाविष्ठ करण्यात आल्या आहेत. त्यांना विविधपुरस्कार साहित्य क्षेत्रासाठी देण्यात आले आहेत. डॉ. गिरासे हे आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे स्व. अण्णासाहेब आर.डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय म्हसदी, ता. साक्री,जि. धुळे येथे प्राचार्य पदावर कार्यरत आहेत, त्यांनी एम.एस्सी. (फिजीक्स / इलेक्ट्रॉनिक्स), एम.ए. (मराठी) व पीएच.डी. पदवी संपादन केली आहे. त्यांना रू. ५१,०००/-, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह असा कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्कार दि. १८ ऑगस्ट २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या समारंभात देण्यात येणार आहे.

**बातमी नं. २**

जळगाव दि. १ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ प्रशाळा व संलग्नित महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विविध विषयांसाठी विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश घेण्याकरीता ३१ जुलै, २०२५ पर्यंत दिलेली मुदत तारीख १६ ऑगस्ट, २०२५ पर्यंत वाढवून देण्यात येत आहे.

विद्यार्थ्यांना ई-सुविधा मध्ये प्रवेशाबाबतची माहिती भरतांना अडचणी येत होत्या त्याकरीता महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी विद्यापीठास मुदतवाढ देणे बाबत कळविले होते. त्या अन्वये विद्यार्थी हित लक्षात घेता कुलगुरूंनी प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांनी मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. याची कृपया सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. असे विद्यापीठाच्या वतीने कळविण्यात येत आहे.

.....................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: १ऑगस्ट, २०२५

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता